# महाराष्ट्र विधानपरिषद

## द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२४

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### चक ठाणेवासना (ता.पोंभुर्णा, जि.चंद्रपूर) येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१) १५५८८ (२८-१२-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चक ठाणेवासना (ता.पोंभुर्णा, जि.चंद्रपूर) येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सिमेंट कॉक्रीट रस्त्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१७-०१-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पोंभुर्णा यांचे स्तरावर चौकशी सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### जव्हार, मोखाडा (जि.पालघर) येथील अनेक गावपाड्यांनाजोडणाऱ्या रस्त्यांच्या कामासह पाणी, आरोग्य, वीज आणि शिक्षण या प्राथमिक सोयी पुरविण्याबाबत

**(२) १७०९९ (२५-०३-२०२३) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार, मोखाडा (जि.पालघर) येथील अनेक गावपाड्यांना रस्त्यांच्या विकास कामासाठी दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर होऊन रस्त्यांची कामे अजूनही अपूर्णच असून सदर गावपाड्यांना जोडणारे रस्ते नसल्याने आदिवासी बांधवांना अनेक सोयी – सुविधांपासून वंचित राहावे लागत असल्याची बाब दिनांक २ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जव्हार तालुक्यातील १ लाख ६० हजारांच्या आसपास लोकसंख्या असून १०९ महसूल गावे आणि २४५ पाडे आहेत, मात्र या जव्हार तालुक्याला जोडणाऱ्या रस्त्यांची कामे व्यवस्थितरित्या होत नसल्याने शासनाकडून ग्रामीण भागासाठी दरवर्षी कोट्यावधींचा निधी उपलब्ध होतो, तरी पण कामे अपूर्णच आहेत, हे पण खरे आहेत काय,
(३) असल्यास, जव्हार, मोखाडा (जि.पालघर) या तालुक्यांतील बहुतांश आदिवासी पाडे आणि गावे ही पाणी, आरोग्य, वीज आणि शिक्षण या प्राथमिक सुविधांपासून वंचित राहिली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या भागांतील गरोदर महिलांना सदर गावात वाहतुकीसाठी पक्का रस्ता नसल्याने डोली करून आजही दवाखान्यात न्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-२ अंतर्गत, पालघर जिल्ह्यातील बहुतांश तालुक्यांना जोडणाऱ्या रस्त्यांच्या कामांस प्रशासकीय मान्यता देण्यानुषंगाने केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जव्हार, मोखाडा या तालुक्यांसह पालघर जिल्ह्यातील अनेक गावपाड्यांना जोडणाऱ्या रस्त्यांची कामे हाती घेण्यासह पाणी, आरोग्य, वीज आणि शिक्षण या प्राथमिक सोयीसुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे, वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०२-०१-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

जव्हार व मोखाडा तालुक्यातील रस्त्यांच्या विकास कामांसाठी मंजूर निधीतून गावपाड्यांना जोडणारे बहुतांशी रस्ते माहे मार्च, २०२३ अखेर पूर्ण करण्यात आले आहेत. काही रस्त्यांची कामे निविदा स्तरावर आहेत.

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अशा प्रकारची न जोडलेली वाडे/पाडे जोडण्यासाठी भगवान बिरसा मुंडा जोडरस्ते योजना दिनांक १३/०९/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आली असून त्यातंर्गत अशी सर्व कामे केली जाणार आहेत.

(३) व (४) जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना तसेच, वार्षिक सर्वसाधारण योजना अंतर्गत पाणी, आरोग्य, वीज आणि शिक्षण या पायाभूत सुविधांकरीता प्राध्यान्य क्रमाने निधी उपलब्ध करुन देऊन संबंधित यंत्रणेमार्फत कामे करुन घेतली जातात.

(५) व (६) राज्यात दिनांक ०६/०१/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-२ ची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत पालघर जिल्ह्याकरीता १७६ कि.मी. लांबीचे ग्रामीण मार्ग/इतर जिल्हा मार्ग दर्जोन्नतीचे उदिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार आतापर्यंत एकूण १७७.३३ कि.मी. लांबीच्या रुपये १८५.६० कोटी रकमेच्या ४८ कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून, सदरची सर्व कामे निविदास्तरावर आहेत.

---

## राज्यातील कृषी विभागाच्या माध्यमातून राष्ट्रीय कृषी यात्रिकीकरण अभियांना अंतर्गत शेतकऱ्यांनी घेतलेल्या कृषी साहीत्याचे अनुदान न मिळाल्याबाबत

**(३) १९३६४ (०८-०८-२०२३) श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेशदादा पाटील, प्रा.राम शिंदे, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: चंद्रपूर व कोल्हापूर जिल्ह्यातील शेकडो शेतकऱ्यांना कृषी यांत्रिकीकरणाचे अनुदान प्राप्त न झाल्याने आर्थिक संकटांना सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय कृषी यांत्रिकीकरण अनुदान योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ट्रॅक्टर, पावर टिलर, फळबाग लागवड, कडबा कुट्टी मिशन, काजू प्रक्रिया युनिट, कोल्ड स्टोरेज, तुषार सिंचन, ठिबक सिंचन, विद्युत पंप, पलटी, शेततळे, रोटावेटर यांच्यासह ५२ यंत्रांना सूचीनुसार अनुदान दिले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त योजनेंतर्गत राज्यातील सर्व शेतकऱ्यांना यांत्रिकीकरणासाठी अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे, वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.धनंजय मुंडे (२४-०१-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे. २०२३-२४ मध्ये दिनांक २८/१२/२०२३ पर्यंत कृषी यांत्रिकीकरणाकरीता चंद्रपूर जिल्ह्यातील लाभार्थ्यांसाठी रुपये ५.६८ कोटी तर कोल्हापूर जिल्ह्यातील लाभार्थ्यांसाठी रुपये ९.७२ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.
(२) फळबाग लागवड, कोल्ड स्टोरेज, तुषार सिंचन, ठिबक सिंचन, विद्युत पंप, शेततळे या घटकांना कृषी यांत्रिकीकरण योजनेतून अनुदान दिले जात नाही. केंद्र शासनाच्या सूचनांमध्ये अधिसूचित यंत्र/औजारांना अनुदान दिले जाते. उदा. ट्रॅक्टर, पावर टिलर इत्यादी.
(३) व (४) सन २०२३-२४ मध्ये केंद्र पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत रुपये १०३.४६ कोटी, राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत रुपये २१०.०० कोटी याप्रमाणे रुपये ३१३.४६ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

---

## ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील शाळांच्या दुरुस्ती कामात दिरंगाई होत असल्याबाबत

**(४) २११८२ (२८-११-२०२३) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील ३४ शाळांच्या दुरुस्तीसाठी रुपये १५ कोटींची निविदा एकत्रितरित्या सन २०२२-२०२३ अंतर्गत प्रसिध्द करण्यात येऊन त्यासाठीचा कार्यादेश माहे मार्च, २०२३ रोजी देण्यात आला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिका क्षेत्रातील शाळा दुरुस्तीची कामे हाती घेतल्यानंतर सहा महिन्यांच्या कलावधीत ३४ पैकी केवळ ५ शाळांची कामे पूर्ण झाली असून उर्वरीत शाळांची कामे अद्यापही सुरु करण्यात आली नसल्यामुळे आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी संबंधितांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शाळांच्या दुरुस्तीच्या विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-१२-२०२३) :** (१), (२) व (३) ठाणे महानगरपालिका क्षेत्रामधील ३४ शाळा व ११ बालवाडी दुरूस्तीच्या रुपये १६.९७ कोटी रकमेच्या कामांअंतर्गत एकत्रित निविदा मागवून दिनांक ०८/०३/२०२३ रोजी महानगरपालिका स्तरावर कार्यादेश निर्गमित करण्यात आला आहे.

सदरची दुरूस्तीची कामे १२ महिन्याच्या कालावधीमध्ये (पावसाळा वगळून) पूर्ण करण्याची मुदत देण्यात आली आहे.

उपरोक्त प्रस्तावातंर्गत शाळांमध्ये रचनात्मक दुरूस्ती, शाळेमध्ये शौचालयांची दुरूस्ती, अंतर्गत खोल्यांमध्ये प्लॅस्टर, रंगरगोटी, दरवाजे व खिडक्या दुरूस्ती, वॉटर प्रुफींग, लाद्या दुरूस्ती व इतर आवश्यक स्थापत्य कामे केली जाणार असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

दरम्यान सदर निविदेअंतर्गत समाविष्ट असलेल्या काही शाळांच्या दुरूस्तीचे काम संथगतीने व काही शाळांचे काम सुरू न झाल्याने संबंधित अधिकाऱ्यांना महानगरपालिकेच्या आयुक्त स्तरावरुन कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली ही वस्तुस्थिती आहे. सदर बाब महानगरपालिकेच्या अंतर्गत कामकाजाचा भाग असून त्याद्वारे कामे विहित वेळेत पूर्ण करण्याच्या अनुषंगाने उक्त कार्यवाही केल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

तथापि, महानगरपालिकेने कळविल्यानुसार सद्य:स्थितीत प्रत्यक्ष जागेवर ७०% भौतिकदृष्ट्या कामे पूर्ण झाली असून या कामापोटी संबंधित ठेकेदारास रुपये ५१७ लक्ष चे प्रदान करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी आतापर्यंतचे काम समाधानकारक असल्याचे ठाणे महानगरपालिकेने नमुद केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील जीर्ण इमारतींच्या पुनर्विकासाबाबत

**(५) २१२३६ (२९-११-२०२३) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जीर्ण झालेल्या इमारतींच्या पुनर्विकासाकरीता शासन निर्णयाद्वारे १० टक्के वाढीव एफएसआय देण्याचे शासनाने जाहीर केले असूनही स्वयंपूनर्विकास व्यवहाराकरीता सुकर व्हावा यासाठी चार वर्षापूर्वी देण्यात आलेल्या सवलतीच्या कार्यवाढीसाठी शासन व महानगरपालिकास्तरावर कोणतीच व्यवस्था करण्यात आली नसल्याची अनेक प्रकरणे अजूनही प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी माहिती व निर्णय घेवून मुंबईसह राज्यातील सर्वच प्रमुख शहरातील जीर्ण झालेल्या इमारतींचा स्वयंपुनर्विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-१२-२०२३) :** (१) हे अंशतः खरे आहे.

शासनाच्या गृहनिर्माण विभागाच्या दिनांक १३/०९/२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार, राज्यातील ३० वर्षापेक्षा जुन्या असलेल्या गृहनिर्माण सहकारी संस्था ज्या स्वयंपुनर्विकास करु इच्छितात

त्यांना स्थानिक विकास नियंत्रण नियमावली मधील तरतुदींपेक्षा १० टक्के वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकाचा (एफएसआय) वापर करता येईल.

सदर बाबतीत महानगरपालिकेने दिनांक १८/०५/२०२३ रोजी परिपत्रक निर्गमित करून अधिकाऱ्यांची नेमणूक केली असून महानगरपालिकेच्या संगणकीय कार्यप्रणालीमध्ये स्वयंपुनर्विकासाकरीता ऑनलाईन प्रस्ताव दाखल करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

बृहन्मुंबई क्षेत्रासाठी मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील विनियम ३३ (७) (बी) हे उपकरप्राप्त (cessed) इमारती व्यतिरिक्त विद्यमान निवासी गृहनिर्माण संस्थांच्या, इमारतींच्या पुनर्विकासासाठी अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक देण्याबाबत आहे.

उपकरप्राप्त (cessed) इमारती व्यतिरिक्त विद्यमान निवासी गृहनिर्माण संस्थांच्या विद्यमान इमारतींच्या पुनर्विकासाच्या बाबतीत, जेथे गृहनिर्माण संस्था / मालक किंवा त्यांच्या पुरस्कर्त्याद्वारे पुनर्विकास प्रस्तावित करण्यात आला आहे आणि ज्यामध्ये संस्थेचे विद्यमान सदस्य, भाडेकरु यांना पुन्हा समाविष्ट करण्यात येणार आहे. त्याकरीता विद्यमान बांधीव क्षेत्रफळाच्या १५% किंवा प्रति सदनिकेला १० चौ.मी. ह्यापैकी जे जास्त असेल त्यानुसार प्रोत्साहन अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय असेल.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संगणकीय प्रणालीमध्ये, स्वयंपूर्णविकासाकरीता स्वतंत्ररीत्या व्यवस्था करण्यात आलेल्या संगणकीय प्रणालीमध्ये, आत्तापर्यंत एकूण ५ प्रस्ताव प्राप्त झालेले असून त्यापैकी एक प्रस्ताव प्रक्रियेत आहे व उर्वरीत ३ प्रस्ताव कागदपत्रांची पूर्तता नसल्यामुळे परत पाठविण्यात आलेले आहेत.

(२) राज्यातील नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या च स्वयंपुनर्विकासाला चालना देण्याच्या दृष्टीने दिनांक १३/०९/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सवलतीं जाहीर करण्यात आल्या आहेत. शासन ती निर्णयातील सवलतींची अंमलबजावणी करण्याकरीता गृहनिर्माण विभागामार्फत संबंधित विभागांना निर्देश देण्यात आले आहेत. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दिनांक ३१/०५/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्वयंपुनर्विकास करणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या मानिव अभिहस्तांतरणाच्या प्रस्तावावर नमुना क्र.१० ची नोटीस दिल्यापासून एक महिन्याच्या कालावधीत निर्णय घेणे बंधनकारक केले आहे. महसूल व वन विभाग दिनांक १४/०७/२०२३ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सहकारी संस्थांच्या स्वयंपुनर्विकासातील सभासदांना रुपये १०००/- इतके मुद्रांक शुल्क आकारण्याची तरतुद विहित केली आहे. गृहनिर्माण विभाग दिनांक २९/०८/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्वयंपुनर्विकास योजनेस मंजूरी देण्याकरीता एक खिडकी योजनेंतर्गत ३ महिन्याचा कालावधी विहित केला आहे. तसेच नोडल एजन्सी म्हणून मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा तसेच मुंबई महानगर प्रदेश क्षेत्राकरीता मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांना देखील घोषित करण्यात आले असून यासमवेत अन्य बँकांना योजनेस स्वयंपुनर्विकासासाठी चालना देण्यास पुढाकार घेतल्यास त्यांना देखिल नोडल एजन्सी घोषित करण्याची तरतूद केली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक १८/०५/२०२३ रोजीच्या परिपत्रकान्वये पुनर्विकास करणेकामी सुलभता होण्यासाठी एक खिडकी योजना राबविण्याची तरतूद केली आहे.

(३) विलंब होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## परेल (मुंबई) येथील के.ई.एम. रुग्णालयातील वॉर्डाची दुरवस्था झाल्याबाबत

**(६) २१२४० (२०-११-२०२३) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परेल (मुंबई) येथील के.ई.एम. रुग्णालयातील ६ वॉर्डाची दुरवस्था झाली असून गत १ वर्षापासून सदरचे वॉर्ड बंद असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयातील सी.टी.स्कॅनची मशिन व इतर वैद्यकीय मशिनरी बंद असल्याने रुग्णाच्या आजाराचे निदान होत नसल्याने रुग्णांना वेळेवर औषधोपचार मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील रुग्णालयात सुस्थितीतील सी.टी.स्कॅनची मशिन, इतर वैद्यकीय मशिनरी तसेच पुरेशा वैद्यकीय सुविधा पुरविणे, नादुरुस्त ६ वार्डची दुरुस्ती करणे तसेच रुग्णांना वेळेवर औषधोपचार मिळणेबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-१२-२०२३) :** (१) परळ येथील के.ई.एम. रुग्णालयातील ६ वॉर्ड नुतनीकरणाकरीता माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये बंद करण्यात आलेले आहेत.

(२) व (३) के.ई.एम. रुग्णालयातील दोन सीटी स्कॅन मशीनपैकी एक मशीन सुरु असून, दुसऱ्या मशीनची खरेदी प्रक्रिया बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे. के.ई.एम. रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून रुग्णांना वाडिया रुग्णालयात महापालिकेच्या दरामध्ये सीटी स्कॅन करण्याकरीता पाठविण्याची व्यवस्था केलेली आहे. तसेच नवीन सीटी स्कॅन मशीन माहे जानेवारी, २०२४ पर्यंत इन्स्टॉल होऊन सुरु होणे अपेक्षित आहे.

जनरल मेडिसीनच्या रुग्णांना वेळेवर औषधोपचार मिळण्याकरीता के.ई.एम. रुग्णालयात पुरुष आणि महिला रुग्णांसाठी १२० खाटा आहेत. तसेच जी.टी.बी. हॉस्पिटलमध्ये रुग्ण तपासणीकरीता निवासी डॉक्टर आणि वरिष्ठ डॉक्टरांच्या फेऱ्या सुरु आहेत. सीटी स्कॅन व एक्स-रे करीता रुग्णांना रुग्णवाहिकेतून के.ई.एम. रुग्णालयात नेले जात आहे. के.ई.एम. रुग्णालयामार्फत इतर वैद्यकीय मशिनरी तसेच पुरेशा वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत.

के.ई.एम. रुग्णालयातील नुतनीकरणाच्या कामाकरीता बंद असलेले ६ वॉर्ड शिवडी येथील जी.टी.बी. हॉस्पिटल येथे सुरु करण्यात आले आहेत. त्यामुळे रुग्णांची कोणतीही गैरसोय होत नाही. सदर ६ वॉर्डांच्या नुतनीकरणाचे काम युध्दपातळीवर सुरु असून ते माहे एप्रिल, २०२४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालये तसेच उपनगरीय रुग्णालयांमध्ये दाखल होणाऱ्या सर्व रुग्णांना औषधे उपलब्ध करुन देण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खात्यामार्फत एकूण १२ औषध अनुसूची निर्गमित होतात. सदर अनुसूचीवर असलेली इंजेक्शन व औषधे पुरेशा प्रमाणात रुग्णांना उपलब्ध करुन देण्यात येतात. अनुसूचीवर नसलेली औषधे ही रुग्णसेवा खंडीत होऊ नये म्हणून मध्यवर्ती खरेदी खात्याचे ना-हरकत प्रमाणपत्र घेऊन रुग्णालयीन स्तरावर औषधांची खरेदी आधीच्या अनुसूचीतील कंत्राटदारांकडून त्याच किंमतीमध्ये किंवा स्थानिक बाजारातून तसेच ई-दरपत्रिकेद्वारे लेखा पडताळणी करुन रुग्णांना औषधे उपलब्ध करुन देण्यात येतात.

काही विशिष्ट आजारांकरीता लागणारी महागडी औषधे के.ई.एम. रुग्णालयातील समाजसेवकांमार्फत देणगी स्वरुपात तसेच, शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या जननी शिशु सुरक्षा योजना, महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजना व प्रधानमंत्री जीवनदायी आरोग्य योजना या योजनांमार्फत रुग्णांना औषधे उपलब्ध करुन दिली जातात.

दारिद्रय रेषेखालील गरीब आणि दुर्बल घटकातील रुग्णांना अनअनुसूचित तात्काळ लागणारी औषधे गरीब रुग्ण धर्मादाय निधीमधून उपलब्ध करुन दिली जातात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नेरूळ ते मुंबई जलवाहतूक सेवा विनाविलंब पूर्ण करण्याबाबत

**(७) २१६७८ (०५-०१-२०२४) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरूळ (नवी मुंबई) येथील साडेतीन हेक्टर क्षेत्रावर रुपये १११ कोटी खर्चून बांधलेल्या जेट्टीवरून नवी मुंबई ते मुंबईतील भाऊचा धक्क्यादरम्यान जलवाहतूक सेवेचे काम सिडको सुरु करणार असल्याची बाब दिनांक १४ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जल वाहतूक सेवा सुरु करण्याकरीता भागीदार निवडण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरु केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नेरूळ ते मुंबई जलवाहतूक सेवा विनाविलंब लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०२-२०२४) :** (१), (२), (३) व (४) हे खरे आहे.

नवी मुंबईत जल वाहतुकीकरीता नेरुळ येथे प्रवासी जल वाहतूक टर्मिनसच्या उभारणीचे काम दिनांक ३१/१०/२०२१ रोजी पूर्ण झाले असून मेरीटाईम बोर्डने नेरुळ-भाऊचा धक्का, नेरुळ-एलिफंटा, नेरुळ-जेएनपीटी अशा वाहतुकीकरीता जलसेवा देणाऱ्या संस्थांना परवाना जारी केला आहे. सिडको संचालक मंडळाच्या दिनांक ११/०६/२०२२ रोजीच्या मान्यतेनुसार जलवाहतूक परिचालक नेमणुक सिडकोमार्फत प्रकल्प संचालीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी परिचालक नेमणुकीकरीता प्रथमत: दिनांक १२/०९/२०२२ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या व प्रथम बोली दरम्यान केवळ एक बोली प्रतिसादामुळे निविदा रद्द करण्यात आली असून निविदेच्या अटी व शर्तीत बदल करुन दुसऱ्यांदा

दिनांक १५/०९/२०२३ रोजी निविदा मागविल्या होत्या. तथापि, एकही बोली प्राप्त न झाल्याने निविदा रद्द करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत, निविदेच्या अटी व शर्ती शिथिल करुन निविदा प्रक्रिया नव्याने सुरु असून परिचालकाची नेमणूक करुन जलवाहतूक सुरु करण्यात येणार आहे.

---

## बोदवड (जि.जळगाव) नगर पंचायतीमधील कामकाजासंदर्भात अधिकाऱ्यांविरुध्द तक्रारी प्राप्त झाल्याबाबत

**(८) २१८५९ (०५-०१-२०२४) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोदवड (जि.जळगाव) नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांच्या कामकाजासंदर्भात अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असून, उक्त तक्रारीबाबत सखोल चौकशी करून कारवाई करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.संचालक नगर प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडे दिनांक १३ ऑगस्ट, २०२३ रोजी पत्रव्यवहार केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बोदवड नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०२-२०२४) :** (१) अंशतः खरे आहे.

तथापि, बोदवड नगरपंचायतीच्या निविदा प्रक्रियेतील अनियमिततेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांची दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२३ रोजीची तक्रार नगरपरिषद प्रशासन संचालनालयास प्राप्त झाली आहे.

(२) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सखोल चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या दिनांक ०१ डिसेंबर, २०२३ रोजीच्या पत्रान्वये विभागीय सह आयुक्त / उपायुक्त, नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांना कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने नगरपरिषद प्रशासन संचालनालय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खोपोली नगरपरिषदेने (जि.रायगड) परिवहन सेवेबाबतचा केलेला करार संपुष्टात आल्याबाबत

**(९) २१९६८ (२८-११-२०२३) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली नगरपरिषदेने (जि.रायगड) परिवहन सेवेबाबतचा केलेला करार चार महिन्यापूर्वी संपुष्टात येऊनही परिवहन सेवेचा कंत्राटदार बस चालवित असल्याप्रकरणी नागरिकांनी नगरपरिषद प्रशासनाकडे अनेक वेळा तक्रारी करुनही नगरपरिषद प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन परिवहन सेवेचा करार संपूनही नगरपरिषदेने करार रद्द न करण्याची कारणे काय आहेत तसेच नगरपरिषदेकडून सदर करार रद्द न करणाऱ्या नगरपरिषदेतील संबंधित अधिकारी/ कर्मचारी व संबंधित ठेकेदार यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) खोपोली नगरपरिषदेतंर्गत राबविण्यात येत असलेल्या खाजगी परिवहन सेवेची मुदत दिनांक ३०/०४/२०२३ पर्यंत होती. करारनाम्याच्या कालावधीत कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे राज्यात मार्च, २०२० पासून लॉकडाऊन घोषित केल्याने सदरची सेवा २२ महिने बंद ठेवण्यात आली होती. नगरपरिषदेने नागरीकांच्या सोईसाठी करारनाम्यातील अटीनूसार ठराव घेऊन सदर परिवहन सेवेस दिनांक ०१/०५/२०२३ पासून पुढील २४ महिन्यांकरीता मुदतवाढ दिली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील बारा अति मागास जिल्ह्यांचा विकास करण्यासाठी मानव विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबविणेबाबत

**(१०) २२१८५ (०४-०१-२०२४) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बारा अतिमागास जिल्ह्यांचा विकास करण्यासाठी शासनाने दिनांक २९ जून, २००६ अन्वये मानव विकास मिशनची स्थापना करण्यात आली आहे. राज्य शासनाने मानव विकास कार्यक्रमाचा लाभ अधिकाअधिक लोकांना मिळावा या उद्देशाने ह्या कार्यक्रमाची १५ जिल्ह्यातील क वर्ग नगरपालिका क्षेत्रात अंमलबजावणी सुरू केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कार्यक्रमांतर्गत झालेले विकास कामे व सदर जिल्ह्यातील नागरिकांचा मानव विकास निर्देशांक उंचावलेला आहे किंवा कसे याबाबत शासनाने आढावा घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आढाव्याच्या अनुषंगाने काय आढळून आले, त्यानुंषगाने बारा अति मागास जिल्ह्यांची प्रगती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (०८-०२-२०२४) :** (१) होय हे खरे आहे,

नियोजन विभाग, शासन निर्णय दिनांक १९/०७/२०११ अन्वये राज्यातील २३ जिल्ह्यातील १२५ अतिमागास तालुक्यामध्ये "आरोग्य, शिक्षण व उत्पन्नवाढ" या ३ बाबींशी संबंधित "मानव विकास कार्यक्रम" राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

नियोजन विभाग, शासन निर्णय, दिनांक १२/०७/२०१२ अन्वये १५ जिल्ह्यातील ४३ क वर्ग नगरपालिकांचा ही मानव विकास कार्यक्रमांतर्गत समावेश करण्यात आला आहे.
(२) व (३) मानव विकास कार्यक्रमांतर्गत सन २०११-१२ पासून दरडोई उत्पन्न वाढविणे, आरोग्यविषयक सुविधा पुरविणे, दारिद्र्य निर्मूलन, शिक्षण इत्यादी विषयीच्या नियमित योजना व जिल्हा तालुका स्पेसिफिक

योजना या १२५ तालुक्यांत राबविण्यात येतात. महाराष्ट्र मानव विकास अहवाल २०२३ तयार करण्याची कार्यवाही अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत सुरु आहे.
(४) निरंक

---

## राज्यातील सार्वजनिक रुग्णालयांच्या रक्तपेढ्यामध्ये रक्त वाया जात असल्याबाबत

**(११) २२२०४ (०६-१२-२०२३) श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रक्ताशी संबंधित विविध प्रकारचे आजार असलेल्या लहान मुलांमध्ये प्रौढ रुग्णांइतकी रक्ताची गरज लागत नसल्यामुळे रक्त वाया जाऊ नये यासाठी रक्तपेढ्यामध्ये ॲलिकॉट मशीन (रक्ताच्या लहान पिशव्या तयार करणारे यंत्र) उपलब्ध असणे गरजेचे असून सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या ३१ रक्तपेढ्यापैकी केवळ ८ रक्तपेढ्यामध्ये ॲलिकॉट मशीन (रक्ताच्या लहान पिशव्या तयार करणारे यंत्र) ही सुविधा उपलब्ध असल्याचे वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील १४ रुग्णालयांपैकी केवळ ३ ठिकाणीच ही सुविधा उपलब्ध असल्याची बाब दिनांक २ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ॲलिकॉट मशीन या यंत्रातील तंत्रज्ञान नवीन व अत्याधुनिक असून याचा वापर करण्याकरीता तंत्रज्ञानाची कमतरता मोठ्या प्रमाणात या रक्तपेढ्यामध्ये असल्याने याचा वापर कसा करायचा यासंदर्भातील माहिती रक्तपेढ्याना देण्यासाठी प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी त्यानुषंगाने राज्यातील सार्वजनिक रुग्णालयामंधील वाया जात असलेले रक्त थाबाविण्याकरीता त्याचप्रमाणे अत्याधुनिक यंत्र सामुग्रीच्या वापराकरीता तंत्रज्ञान नेमून योग्य सोयी-सुविधा उपलब्ध करण्याकरीता शासनस्तरावर कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१२-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) ॲलिकॉट मशीनचे तंत्रज्ञान हे नवीन नाही. ॲलिकॉट मशीन हे लहान यंत्र असून रक्ताची ३५० मि.ली.ची पूर्ण बॅग गरजेप्रमाणे विभाजन करुन बाल रुग्णांना अचूक तेवढेच रक्त देण्यासाठी या मशीनचा उपयोग होतो. यासाठी विशेष प्रशिक्षणाची गरज नाही. सध्या कार्यरत असलेले रक्तकेंद्र तंत्रज्ञ ही मशीन वापरु शकतात.
(३) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील ज्या शासकीय रक्तकेंद्रामध्ये Sterile Connecting Device मशीन उपलब्ध नाही, अशा ठिकाणी सदरचे मशीन व त्यासाठी लागणारे कन्झुमेबल्स येत्या एक वर्षाच्या कालावधीमध्ये निधीच्या उपलब्धतेनुसार आवश्यक ती खरेदी प्रक्रिया अवलंबून खरेदी करण्याच्या सूचना जिल्हा शल्य चिकित्सक व वैद्यकीय अधीक्षक यांना दिनांक ३०/११/२०२३ अन्वये दिलेल्या आहेत. सदर मशीनसाठी स्वतंत्र तंत्रज्ञ नेमण्याची गरज नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापुर जिल्ह्यात अत्यावश्यक वैद्यकीय सेवा पुरवणेबाबत

**(१२) २२२३३ (०६-१२-२०२३) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्डुवाडी व माढा शहरामध्ये (ता.माढा, जि.सोलापुर) ग्रामीण रुग्णालये असून तालुक्याच्या ग्रामीण भागात विविध ठिकाणी आठ प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत परंतु या कोणत्याही दवाखान्यात रुग्णांना सीटीस्कॅन, सोनोग्राफी, एम आर आय, व्हेंटीलेटर या सारख्या मोठ्या सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णांना सोलापुर येथील सिव्हील हॉस्पीटलमध्ये पाठविण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापुर येथील सिव्हील रुग्णालय येथील सीटी स्कॅन मशीन पुन्हा बंद पडल्याने तेथील रुग्णांना खाजगी रुग्णालयात पाठविले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सोलापुर जिल्ह्यात माढा तालुक्यात निदान ग्रामीण रुग्णालयात रुग्णांसाठी अत्यावश्यक सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनस्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१४-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) सोलापूर जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हा रुग्णालय कार्यरत नसुन सदर ठिकाणी वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय कार्यरत आहे.

सदर वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील सीटी स्कॅन मशीनचे आयुष्यमर्यादा १० वर्षापेक्षा जास्त झाल्याने कंपनीने सर्वसमावेशक देखभाल करार (CMC) किंवा वार्षिक देखभाल करार (AMC) करण्यास असहमती दर्शविलेली आहे. १२८ Slice Multi Detector C T Scan Machine with Electrical & Civil Turn Key (Buy Back) खरेदी करण्याची कार्यवाही वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागामार्फत सुरु आहे.

(३) ग्रामीण रुग्णालयामध्ये आंतररुग्ण, बाहयरुग्ण, प्रसुती कक्ष, कुटुंब नियोजन शस्त्रक्रीया, रुग्णवाहिका, प्रयोगशाळा चाचण्या, लसीकरण, लहान - मोठ्या शस्त्रक्रीया व ईतर राष्ट्रीय कार्यक्रमांची अंमलबजावणी ई. सुविधा उपलब्ध असून सदरच्या सेवा शासन निर्णय दिनांक २३/०८/२०२३ नुसार जनतेला मोफत उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## राज्यातील खाजगी बसेसच्या दरांवर नियंत्रण आणण्याबाबत

**(१३) २२३७२ (०५-०१-२०२४) श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये खाजगी ट्रॅव्हल्सचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात असून खाजगी बसेसच्या माध्यमातुन सर्व सामान्य जनता प्रवास करत असल्यामुळे या खाजगी ट्रॅव्हल्सच्या दरांवर देखरेख ठेवण्यासाठी शासन एक समिती गठीत करणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समितीच्या आजपर्यंत एकूण किती बैठका घेण्यात आल्या व त्यानुसार खाजगी बसेसच्या दरांवर नियंत्रण आणण्यासाठी कोणत्या प्रकारची उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-०२-२०२४) :** (१) नाही.
(२) राज्यातील खाजगी कंत्राटी प्रवाशी वाहनांचे कमाल भाडेदर दिनांक २७/०४/२०१८ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे निश्चित केले आहेत.

राज्यातील प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांमार्फत खाजगी प्रवासी बसेसची तपासणी नियमितपणे करण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्ह्यातील महावितरण विभागाने अनुकंपा तत्वावर नोकरीत सामावून घेण्यास विरोध केल्याबाबत

**(१४) २२३९९ (०४-०१-२०२४) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यातील महावितरण विभागामध्ये कनिष्ठ तंत्रज्ञ या पदावर कार्यरत असलेल्या कै.उदेभान मेघने यांच्या दिनांक १ जुन, २०१० रोजी अपघाती मृत्यूनंतर त्यांच्या जागेवर त्यांची मुलगी श्रीमती सविता मेघने यांना महावितरण विभागात अनुकंपा तत्वावर शासकीय नोकरीत सामावून घेण्याकरीता गेली १२ वर्षे संघर्ष करीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वडिलाच्या मृत्यूनंतर शिधापत्रिकेवरील नावे कमी केल्यामुळे श्री.चंद्रशेखर मेघने यांनी श्रीमती सविता मेघने यांना नोकरीत सामावून घेण्यास विरोध केला असून राज्य अनुसूचित जाती - जमाती आयोगाने श्रीमती सविता मेघने यांना दिनांक ७ ऑक्टोबर, २०२२ रोजी नोकरीत सामावून घेण्यासंदर्भात आदेश दिले असतानाही महावितरण विभागाकडून त्याची अंमलबजावणी होत नसल्याने प्रधान सचिव, ऊर्जा विभाग यांच्याकडे निवेदनाद्वारे तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाने महावितरण विभागाला दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने श्रीमती सविता मेघने यांना नोकरीत सामावून घेण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिवंगत उदेभान मैघने यांच्या मृत्यूनंतर त्यांची मुलगी श्रीमती सविता मैघने यांनी अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळणेकरीता सन २०१२ मध्ये अर्ज सादर केला होता. तथापि, श्रीमती सविता मैघने यांनी अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीकरीता कंपनीच्या प्रचलित नियम/ नियमावलीनुसार पात्र होत नाहीत.
(२) व (३) हे खरे आहे.

कर्मचाऱ्यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या कुटुंबात इतर कोणतीही व्यक्ती मिळवती नसेल व उत्पन्नाचे इतर साधन नसेल अशाच प्रकरणी अवलंबितांना मदत म्हणून अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबतची

महावितरण कंपनीमध्ये तरतूद आहे. श्रीमती सविता मैघने यांच्या एकत्रित कुटुंबात श्री.चंद्रशेखर मैघने ही कमवती व्यक्ती असल्याने त्यांना अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती देण्यात आली नाही. मा.महाराष्ट्र राज्य, अनुसूचित जाती-जमाती आयोगाने महावितरण कंपनीला दिलेल्या निर्देशानुसार पत्र क्र. मास/मावक/३१२७५ दिनांक १७/१०/२०२३ अन्वये श्रीमती सविता मैघने यांच्या प्रकरणाबाबत मा.आयोगास सविस्तर अहवाल सादर करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई एमएमआरडीए क्षेत्रातील ॲप आधारित कॅब कंपन्या आणि तत्सम ॲप आधारित कंपन्यांच्या संपाबाबत

**(१५) २२५३१ (०५-०१-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई एमएमआरडीए क्षेत्रातील काळी -पिवळी टॅक्सी, रिक्षा, कुल कॅब तसेच ओला उबेर आणि तत्सम ॲप आधारित कॅब कंपन्या, स्विगी, झोमॅटो सारख्या अन्न आणि वस्तू पोहोचवणारे डिलिव्हरी बॉय आदींनी ऐन दिवाळीच्या तोंडावर बेमुदत आंदोलनाचा इशारा दिला असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र टॅक्सी, रिक्षा, कॅब चालक, डिलिव्हरी संयुक्त कृती समिती व इतर संघटनांनी केलेल्या विविध मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने तात्काळ कार्यवाही करून ऐनदिवाळीच्या सणात होणारा संप मिटविण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-०२-२०२४) :** (१) दिनांक १३/१०/२०२३ रोजीच्या वृत्तपत्रामध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली आहे.
(२) सदर आंदोलनाबाबत कोणतेही निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईमध्ये म्युझिक कंपनीच्या मालकाचे अपहरण केल्याबाबत

**(१६) २२५४७ (२७-११-२०२३) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये म्युझिक कंपनीच्या मालकाचे अपहरण केल्याप्रकरणी वनराई पोलीस स्थानकात भा.दं.वि. कलम ३६४-अ, ४५२, १४३, १४७, १४९, ३२३, ५०४, ५०६ व शस्त्रात्र अधिनियम ३,२५ अन्वये गुन्हाची नोंद करुनही अद्याप आरोपींना अटक करण्यात आली नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटना घडली तेथील जागेचे सीसीटीव्ही फुटेज सुध्दा पोलीसांना उपलब्ध करुन देण्यात आले असतानाही पोलीसांकडून आरोपींना अटक करण्यास दिरंगाई करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळन आले व चौकशीच्या अनुषंगाने सदर गुन्ह्यातील आरोपींना अटक करुन त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०७-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे नाही.
सदर प्रकरणी वनराई पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. कलम ३६४ (अ), ४५२, १४३, १४७, १४९, ३२३, ५०४, ५०६ भा.द.वि. सह कलम ३, २५ शस्त्रात्र अधिनियम अन्वये दिनांक १०/०८/२०२३ रोजी गुन्हा नोंद असून, सदर प्रकरणातील ९ आरोपीतांना अटक करण्यात आली होती. सदर आरोपींना जामीन प्राप्त झाला आहे तथापि, सदर आरोपींपैकी काही आरोपींविरुध्द फौ.दं.प्र.सं. कलम ११० अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा अधिक तपास चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात खाजगी भागीदारीतून उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी खाजगी गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्याच्या निर्णयाबाबत

**(१७) २२६५७ (०४-०१-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे, श्री.महादेव जानकर, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात खाजगी भागीदारीतून उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी स्वतंत्र धोरण राबवून मोठ्या प्रमाणावर खाजगी गुंतवणुकीला जलविद्युत प्रकल्पामध्ये प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात १०७५७ मेगावॅटचे अपारंपारिक ऊर्जा उत्पादन झाले असून २०२५ पर्यंत ही ऊर्जा क्षमता २५००० मेगावॅट पर्यंत नेण्याचे उद्दिष्ट असूनन पवन ऊर्जा पुरेशी नसल्यामुळे जलविद्युत प्रकल्प उभारण्यासाठी केंद्रीय मंत्री, विद्युत मंत्रालयाने देशात उदंचन जलविद्युत प्रकल्पाला उत्तेजन देण्याचे ठरवले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्प उभारण्यासाठी विकासकाची निवड सामंजस्य कराराद्वारे, सरळ वाटप किंवा स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेतून करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी प्रकल्प उभारण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

"सार्वजनिक खाजगी भागीदारीद्वारे उदंचन जलविद्युत प्रकल्प (PSP) आणि सह:स्थित उदंचन जलविद्युत प्रकल्प सौर/ इतर अपारंपारीक संकरित प्रकल्पांच्या विकसनासाठीच्या" धोरणास दिनांक १०/१०/ २०२३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

(२) होय, हे ही खरे आहे.

विद्युत मंत्रालयाने दिनांक ०८/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये केंद्रशासन पुरस्कृत उपक्रमांना राज्यातील उदंचन जलविद्युत प्रकल्पांचे वाटप करण्यात आले असून, उदंचन जलविद्युत प्रकल्पांना उत्तेजन देण्या- करीता दिनांक १०/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.

(३) होय, हे ही खरे आहे.

(४) सदर धोरण जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२१/CR८२/२०२१/HP, दिनांक २०/१२/२०२३ अन्वये प्रसृत करण्यात आले असून, त्यात प्रश्नातील मुद्दा क्र.३ च्या अनुषंगाने तरतूद करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे येथील सिडकोच्या घरांच्या विक्रीसाठी देण्यात आलेल्या कंपनीच्या निविदेप्रक्रियेची चौकशी करण्याबाबत

**(१८) २२७०५ (२४-११-२०२३) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यामध्ये सिडकोकडून बांधण्यात आलेल्या ६७ हजार घरे व व्यावसायिक गाळयांच्या विक्रीसाठी नेमण्यात आलेल्या मे.हेलिओस मेडियम बाजार प्रा.लि. व मे.थॉट्रेन डिझाईन प्रा.लि. या संयुक्त भागीदारीत असलेल्या कंपनीला देण्यात आलेल्या निविदेची चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत नगरविकास विभागाकडून सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांना पत्राद्वारे विचारणा करण्यात आली असूनही सिडकोकडून अहवाल सादर करण्यात आला नसल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरविकास विभागाकडून निविदेची चौकशी करण्याबाबत आदेश दिले असतानाही पुणे सिडकोकडून घरांच्या विक्रीसाठीची जाहिरात व इव्हेंट त्याच कंपनीच्या माध्यमातून करण्यासाठी रुपये १५० कोटी खर्च करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निविदेमुळे कंपनीला सिडकोच्या घरांची व गाळयांची विक्री करताना प्रत्येक घरामागे १ लाख रुपये देण्यात येणार असून सदर कंपनीशी अधिकाऱ्यांचे असलेले आर्थिक हित संबंधांमुळे त्याच कंपनीला पुन्हा कोटयावधीची कामे देण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नगरविकास विभागाने मागितलेला निविदेचा चौकशी अहवाल देण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच सिडकोकडून सदर कंपनीला देण्यात आलेल्या कामांची वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशी करण्याबाबत व घरे विक्रिसाठी देण्यात आलेली निविदा रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-१२-२०२३) :** (१) नवी मुंबईतील सिडको महामंडळाकडुन बांधण्यात येणाऱ्या गृह निर्माण योजनेतील सदनिका व व्यवसायिक गाळे विक्री करण्यासाठी व त्यांचे विपणन, ब्रँडींग, विक्री व विक्री पश्चात सेवा देणे यासाठी मे.हेलिओस मेडियम बाजार प्रा.लि. व मे.थॉट्रेन डिझाईन प्रा.लि. या संयुक्त भागीदारीत असलेल्या व न्युनतम निविदाधारक (L-१ Bidder) ठरलेल्या कंपनीला सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्र. १२५४८, दिनांक २ एप्रिल, २०२२ अन्वये सल्लागार कंपनी (Adviser Consultant) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

यासंदर्भात तत्कालीन मा.विरोधी पक्ष नेते, विधानसभा यांनी चौकशी करण्याबाबत केलेल्या मागणीनुसार शासनाच्या दिनांक ३ ऑगस्ट, २०२३ च्या पत्रानुसार सिडकोकडून अहवाल मागविण्यात आला होता.सदरचा अहवाल दिनांक ११ ऑगस्ट, २०२३ रोजी प्राप्त झाला असून शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(२) व (३) मे.हेलिओस मेडियम बाजार प्रा.लि. व मे.थॉट्रेन डिझाईन प्रा.लि. या कंपनीच्या कंत्राटातील प्रस्तावित घरांची विक्री विविध टप्प्यात जाहीर करण्यात येणाऱ्या गृहनिर्माण योजनांचा जाहीरातीचा खर्च विचारात घेऊन रुपये १५० कोटीचे प्रयोजन ठेवण्यात आले असून अद्याप कोणताही खर्च करण्यात आलेला नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य परिवहन महामंडळाच्या जळगांव विभागातील साहित्य साठ्यामध्ये झालेली अनियमितता

**(१९) २२८०५ (२४-११-२०२३) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या जळगांव विभागातील विभागीय भांडारामधील साहित्य साठ्याचे सन २०२०-२०२१ मध्ये लेखापरिक्षण केले असून उक्त साठ्यामध्ये तफावत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगांव विभागात वरिष्ठ संग्रह पडताळणी पथकाने रुपये ४ कोटी ६० लाख इतक्या रकमेची अनियमितता झाली असल्याचे अहवालामध्ये नमूद केले असून राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अन्य ३० विभागातील साहित्य साठ्यामध्ये देखील अनियमितता झाली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दोषीं अधिकारी / कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या जळगांव विभागातील साहित्य साठ्यामध्ये झालेल्या अनियमिततेप्रकरणी दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करुन अन्य ३० विभागातील साहित्य साठ्याचे लेखापरिक्षण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-१२-२०२३) :** (१) होय.

(२) जळगाव विभागाच्या सन २०१८-२०१९ ते २०२१-२२ पर्यंतच्या संग्रह पडताळणांच्या पत्रा - नुसार रुपये ३,५५,१०,८००/- इतक्या रक्कमेचा ताळमेळ व रुपये १,०५,५६,२३६/- इतक्या रक्कमेचे मत्ता लेखा नोंदवही (ब्लॉक अंकाऊन्ट रजिस्टर) ला नोंदी नसणे अशी एकूण रुपये ४,६०,६७,०३६/- च्या त्रुटी बाबत कळविले. तथापि, त्यानंतर रुपये १,०१,५६,२३६/- इतक्या रक्कमेबाबतच्या भांडवली वस्तुंच्या नोंदी ब्लॉक रजिस्टरला घेण्यात आल्या असून रक्कम रुपये ३,५५,१०,८००/- पैकी रुपये २,०५,७०,६५५/- रक्कमेचा ताळमेळ घालुन समायोजन करण्यात आले आहे. उर्वरित प्रलंबित रक्कम रुपये १,४९,४०,१४५/- च्या समायोजनाची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३), (४) व (५) भांडार सामानाचा ताळमेळ घेऊन समायोजन न केल्याच्या अनुषंगाने रा.प. जळगाव विभागातील विभागीय भांडार अधिकारी, भांडार पर्यवेक्षक, वरिष्ठ संग्रह पडताळक, लेखाकार, भांडारपाल व ०८ लिपिक टंकलेखक यांचेवर शिस्त व आवेदन कार्य पध्दतीनुसार आरोपपत्र दिले असून कारवाई चालू आहे. तसेच उर्वरित ३० विभागातील साहित्य साठ्याचे नियमित लेखापरिक्षण करण्यात येत आहे.

---

## अमरावती महानगरपालिकेमधील लेखा विभागाच्या अनियमिततेबाबत

**(२०) २२८०७ (२४-११-२०२३) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महानगरपालिकेने शहराच्या स्वच्छतेसाठी २३ कंत्राटदारांकडून देण्यात आलेली सुरक्षा ठेवीची रुपये १२ कोटीची रक्कम महानगरपालिकेच्या सुरक्षा ठेव (एसडीच्या) खात्यात जमा करण्यात आली नसल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी सदर रक्कम अन्य कामांच्या कंत्राटदारांवर खर्च केली असून महानगरपालिकेकडून देण्यात आलेल्या स्वच्छता कंत्राटाचा कालावधी माहे जानेवारी, २०२४ मध्ये संपुष्टात येत असल्याने महानगरपालिकेच्या लेखा विभागाकडे सुरक्षा ठेव म्हणून जमा करण्यात आलेल्या रक्कमेची मागणी कंत्राटदारांनी केली असता महानगरपालिकेकडे निधी शिल्लक नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकोच्या नियमांचे पालन न करता तत्कालीन आयुक्तांनी कंत्राटदारांना परत करावयाची सुरक्षा ठेव रक्कम खर्च केल्याने स्वच्छता कंत्राटदार असोसिएशने याबाबत विभागीय आयुक्तांकडे चौकशीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या स्वच्छता कंत्राटदारांकडून जमा करण्यात आलेली सुरक्षा ठेव निधीमध्ये अनियमितता करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन कंत्राटदारांकडून जमा करण्यात आलेली सुरक्षा ठेव रक्कम त्यांना परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही,

कंत्राटदाराकडुन जमा करण्यात आलेली सुरक्षा ठेवेची रक्कम स्वंतत्र सुरक्षा ठेव खाते नसल्याने महानगरपालिका निधी खात्यामध्ये जमा करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही,

घनकचरा व्यवस्थापन कंत्राटदारांच्या कंत्राटाचा कालावधी डिसेंबर, २०२३ मध्ये संपुष्टात येत असून, करारनाम्याप्रमाणे कामाची तपासणी करुन अनुज्ञेय सुरक्षा ठेवेची रक्कम परत करण्याची तजविज महानगरपालिकेने केली आहे.

(३) हे खरे आहे.

महानगरपालिका साफसफाई कंत्राटदार असोसिएशन यांनी दिनांक ११/०८/२०२३ रोजी विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडे अर्ज केला आहे.

(४) कंत्राटदार संघटनेच्या अर्जानुसार दिनांक १८/०८/२०२३ रोजी विभागीय आयुक्त, अमरावती यांचे कार्यालयाने आयुक्त तथा प्रशासक अमरावती महानगरपालिका यांना नियमोचित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.